# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १४२) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी–०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.३१ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## पंतप्रधान मोदींच्या इंधन बचतीच्या आवाहनला मंत्री संजय राठोडांकडून तिलांजली, हेलिकॉप्टरमधून प्रवास, दौऱ्यात २० पेक्षा अधिक शासकीय वाहनांचा लवाजमा

वाशिम दि.३० (प्रतिनिधी)– देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेते मंडळी तसेच सर्वच राज्य सरकारला इंधन बचतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला देशभरातील अनेक नेते मंडळींनी प्रतिसाद सुद्धा दिला. मात्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी वाशिम जिल्ह्यातील पोहरादेवी येथील बंजारा वास्तू संग्रहालयाची पाहणी करण्यासाठी नागपूर ते पोहरादेवी असा हेलिकॉप्टरमधून प्रवास केला. सोबतच मोठा शासकीय वाहनाचा ताफा घेऊन पोहरादेवी येथील वास्तू संग्रलायची पाहणी देखील केली. यावेळी मंत्री संजय राठोडसह विजय दर्डा त्यांच्या दौऱ्यात सोबत होते. एकीकडे देशावर इंधन संकट असताना मंत्र्यांकडूनच अशी इंधनाची उधळपट्टी होत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला मंत्र्यांकडून तिलांजली दिल्या जात असल्याच दिसत आहे. मंत्र्यांच्या या पाहणी दौऱ्यात २० पेक्षा अधिक शासकीय वाहने आणि खासगी जवळपास१५ वाहने ताफ्याचा लवाजमा घेऊन हा पाहणी दौरा केल्याने मंत्री संजय राठोड पुन्हा एकवेळा वादात सापडण्याची चिन्ह आहे. यावर संजय राठोड यांनी सारवा सारव केली असून माध्यमांनी प्रश्न विचारला असता आम्ही वाहनांचा ताफा निम्मा केलाय. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आव्हानाला आम्ही सर्वच मंत्री आणि मुख्यमंत्री सुद्धा प्रतिसाद देत असल्याचे सांगितलं. प्रत्यक्षात मात्र संजय राठोड यांच्या ताफ्यात २० ते २२ शासकीय वाहन असल्याचं बघायला मिळालं होतं.

## आयएसआयशी संबंधित ९ जणांना स्फोटकांसह अटक

नवी दिल्ली दि.३० (वृत्तसंस्था)– दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने शनिवारी पाकिस्तानच्या आयएसआय आणि मुंबई अंडरवर्ल्ड नेटवर्कसाठी काम करणाऱ्या नऊ कथित हस्तकांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून शस्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. एएनआयने दिलेल्या बातमीनुसार, हे नेटवर्क दाऊद इब्राहिमशी निगडित गुन्हेगारी जगताशी संबंधित होते.

दिल्लीतील महत्त्वाच्या आस्थापना, सुरक्षा कर्मचारी आणि धार्मिक स्थळांवर हल्ला करण्याचे काम त्यांना सोपविण्यात आले होते, अशी माहिती समोर येत आहे.

पोलिसांमधील सूत्रांनी न्यूज १८ ला दिलेल्या माहितीनुसार, अटक केलेल्या व्यक्तींचा दिल्ली, मुंबई आणि पंजाबशी संबंध आहे. अटक केलेल्या व्यक्तींमध्ये कथितरित्या एका विदेशी व्यक्तीचाही समावेश आहे. अटकेच्या कारवाई दरम्यान शस्त्रे, हँड ग्रेनेड, स्फोटके आणि इतर गुन्हेगारी पुरावे जप्त करण्यात आले आहेत. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही महत्त्वपूर्ण कारवाई असल्याचे तपासकर्त्यांनी सांगितले.

प्राथमिक तपासात, अटक केलेल्या व्यक्तींचा पाकिस्तानमधील सूत्रधारांशी, तसेच मुंबई अंडरवर्ल्डमधील नेटवर्कशी संपर्क होता. सुरक्षा यंत्रणांचे या मॉड्यूलवर काही काळापासून नजर होती. अधिक तपशीलासाठी दिल्ली पोलिसांच्या वतीने लवकरच पत्रकार परिषद घेण्यात येणार आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेने पोलिसांच्या सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, आरोपी दिल्ली, मुंबई आणि पंजाबमधील असून, त्यात काही नेपाळी नागरिकांचाही समावेश आहे. सुरक्षा यंत्रणा आता सूत्रधार आणि स्थानिक सूत्रधारांचा शोध घेत आहेत.

दिल्ली पोलीस आता या मॉड्यूलच्या निधीचे स्रोत, भरती प्रक्रिया आणि लॉजिस्टिक सपोर्ट सिस्टीमचा तपास करत आहे. या कटात कथितरित्या सामील असलेल्या स्थानिक मध्यस्थ आणि परदेशी सूत्रधारांच्या भूमिकेचीही चौकशी केली जात आहे. गेल्या दोन महिन्यांत आयएसआयच्या एजंटांनाही अटक करण्यात आली आहे.

## भगवा रुमाल गुंडाळून जरांगे यांचे उन्हात उपोषण सुरु

जालना दि.३० (प्रतिनिधी)– ५८ लाख जणांच्या कुणबी नोंदीना प्रमाणपत्र व वैधता द्यावी, तसेच मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे आदी मागण्यांच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी झालेली बोलणी फिस्कटल्यानंतर मनोज जरांगे यांनी भर उन्हात बाज टाकून आणि डोक्यावर भगवा रुमाल गुंडाळून त्यानी उपोषणाला सुरुवात केली. परिसरातील काही मंडळी त्यांना पाठिंबा देण्यासाठी आले आहेत.

विखे पाटील यांनी जवळपास सर्व मागण्या मान्य असल्याचे म्हटले आहे. त्यांनी त्यांचा ड्राफ्ट दिला आहे. त्यावर तज्ज्ञांच्या सूचना घेतो, त्या नंतरच सांगणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. मात्र, सर्व मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण स्थळ सोडणार नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

सातारा ,कोल्हापूर, औंध पुणे संस्थानामधील नोंदीच्या आधारे कुणबी प्रमाणपत्राबाबतचे शासन निर्णय काढावेत,



यासह विविध मागण्या केल्यानंतर सरकारकडून कोणती लेखी आश्वासने द्यायचे यावर रात्री बऱ्याच वेळ चर्चा सुरू होती.

आंतरवली सराटीमध्ये चर्चा फिस्कटल्यानंतर मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड हे पुन्हा विभागीय आयुक्त कार्यालयात आले. मुख्य सचिव आणि इतर अधिकाऱ्यांबरोबर बराच वेळ खल चालला होता. एका बाजूला प्रशासकीय पातळीवर सुरू (पान ४ वर)

### मराठा आरक्षणाबाबत सरकार सकारात्मक-मुख्यमंत्री

सरकार मराठा आरक्षणाबाबत सकारात्मक आहे. सरकारची भूमिका पारदर्शक आहे. आम्ही सकारात्मक काम करणारे लोक आहे. आम्ही समाजांना एकमेकांसमोर आणून भांडत नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. तसेच आम्ही समाजाच्या हिताचे निर्णय घेतो. परंतु त्याचवेळी संविधान आणि न्ययालयाच्या निर्णयाच्या आधिन राहून निर्णय घेतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. एका समाजाचं आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला द्यायचा असं कधीही केलं नाही, ओबीसी समाजालाही घाबरण्याची आवश्यकता नाही. मराठा समाजाचाही त्या ठिकाणी समाधान करून देण्याकरिता सगळे निर्णय घेऊ...परंतु ओबीसी समाजावर कोणताही अन्याय होऊ देणार नाही. आता चर्चा झालेली आहे पुन्हा एकदा सांगतो न्यायालय, कायदा आणि संविधान याच्या चौकटीत बसून कोणताही निर्णय घेण्यास तयार आहोत, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

## राजस्थानच्या ५ जिल्ह्यांमध्ये वाळूचे वादळ

जयपूर दि.३० (प्रतिनिधी)– शनिवारी दुपारी राजस्थानमधील चुरू, श्रीगंगानगर, बिकानेर, हनुमानगड आणि सीकर या पाच जिल्ह्यांना वाळूच्या वादळाने तडाखा दिला, ज्यामुळे शहरात दिवसा अंधार पसरला. पाकिस्तानमधून आलेल्या या वादळाचा परिणाम राजस्थानच्या सीमावर्ती जिल्ह्यांवर झाला.

या वादळामुळे लोकांना दिवसा आपल्या वाहनांचे हेडलाइट्स चालू ठेवावे लागले. लोक घरात धावत जाऊन दरवाजे बंद करत असल्याचे अनेक व्हिडिओ समोर आले आहेत. स्थानिकांनी सांगितले की, त्यांनी यापूर्वी असे वाळूचे वादळ कधीही पाहिले नव्हते.

शनिवारी सकाळी उदयपूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडला. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास श्रीगंगानगर या सीमावर्ती जिल्ह्याला धडकलेल्या धुळीच्या वादळाने शहर धुळीने झाकून टाकले. अनेक ठिकाणी वाळूच्या वादळासारखे दृश्य दिसत होते. चुरू आणि बिकानेरमध्येही अशीच दृश्ये पाहायला मिळाली. सीकर जिल्ह्यातील फतेहपूर आणि लक्ष्मणगड परिसरही धुळीच्या ढगांनी व्यापला होता.

बिकानेर शहर आणि भागात निसर्गाचे एक असे रौद्ररूप पाहायला मिळाले, ज्याने नागरिकांच्या अंगावर काटा आणला. दुपारी अचानक आलेल्या एका महाभयंकर धुळीच्या वादळाने संपूर्ण शहराला घेरले. या वादळाचा वेग आणि तीव्रता इतकी भीषण होती की, काही मिनिटांतच संपूर्ण आकाशात धुळीचे प्रचंड साम्राज्य पसरले आणि भरदुपारी रात्रीसारखा अंधार झाला.

## डी.के.शिवकुमार कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री, ३ जून रोजी घेणार शपथ

बंगळुरू दि.३० (वृत्तसंस्था)– कर्नाटकच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. सिद्धरामय्या यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदाचा कार्यकाळ पूर्ण होण्याच्या आधीच मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. आता डी.के.शिवकुमार यांची कर्नाटकच्या मुख्यमंत्री पदी वर्णी लागणार आहे. या पार्श्वभूमीवर आज (३० मे) डी.के.शिवकुमार यांची कर्नाटक काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली आहे.

दरम्यान, आता डी.के. शिवकुमार हे कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री म्हणून येत्या ३ जून रोजी मुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर कर्नाटकात राजकीय घडामोडींना वेग आला असून आता नव्या मंत्रिमंडळात नेमकं कोणाचा समावेश होतो? याकडे कर्नाटकच्या जनतेचं लक्ष लागलं आहेत. या संदर्भातील माहिती काँग्रेसचे नेते के.सी.वेणुगोपाल यांनी दिली आहे.

डी.के.शिवकुमार यांची आज काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली आहे. आता डी.के.शिवकुमार यांच्या मुख्यमंत्री पदाचा शपथविधी सोहळा ३ जून रोजी बंगळुरू येथील लोकभवनात पार पडणार असल्याची माहिती काँग्रेस पक्षाच्यावतीने सांगण्यात येत आहे.

दरम्यान, कर्नाटक काँग्रेस पक्षाच्या म्हणण्यानुसार, सिद्धरामय्या यांनी पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाला नवीन विधिमंडळ



पक्षाचा नेता ठरवण्याचा अधिकार देणारा ठराव मांडला. त्या ठरावाला डॉ.जी.परमेश्वर यांनी अनुमोदन दिलं. त्यानुसार सर्व आमदारांनी डी.के.शिवकुमार यांची एकमताने काँग्रेस विधिमंडळ पक्षाचा नेता म्हणून निवड केली. या बैठकीला के.सी. वेणुगोपाल यांच्यासह काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

"आता ते (डी.के. शिवकुमार) मुख्यमंत्री पदावर दावा करण्यासाठी राजभवनात जात आहेत आणि ३ जून रोजी संध्याकाळी डी.के.शिवकुमार हे आपल्या काही सदस्यांसह मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. कर्नाटकातील हा बदल काँग्रेस पक्षासाठी एक समस्या ठरेल असं अनेकांना वाटत होतं . मात्र, आम्ही एक कुटुंब आहोत. काँग्रेस विधिमंडळ पक्ष गेल्या आठ वर्षांपासून मुख्यमंत्री म्हणून सिद्धरामय्या यांनी केलेल्या सेवेची एकमताने दखल घेत आहे. तो ठराव देखील खुद्द डी.के. शिवकुमार यांनीच मांडला होता. त्यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री म्हणून केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल त्यांचं अभिनंदन. आता काँग्रेस २०२८ मध्येही सर्व नेत्यांच्या पाठिंब्याने कर्नाटकात पुन्हा सत्तेवर येईल", असा विश्वास के.सी.वेणुगोपाल यांनी व्यक्त केला आहे.

## ओबीसींच्या ताटातील हक्काचे आरक्षण हिरावले जाणार असेल तर आम्ही आंदोलन करु, लक्ष्मण हाकेंचा सरकारला इशारा

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)– मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केले आहे. अशातच ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना अल्टिमेट दिला आहे. मनोज जरांगे जर बाजेवर बसून आंदोलन करत असतील तर आम्ही ढेकळात आंदोलन करू असंही हाकेंनी म्हटलंय.

मनोज जरांगे यांनी आज जे काही आंदोलन सुरू केलं आहे, हे आंदोलन जर चालू राहणार असेल आणि ओबीसीच्या ताटातील त्यांच्या हक्काचं अधिकाराचं आरक्षण हिरावलं जाणार असेल तर, आम्ही उद्यापासून सगळ्या ओबीसी बांधवांच्या वतीने आक्रमक असं आंदोलन करणार आहोत. जरांगे बाजेवर बसले आहेत आम्ही ढेकळात बसून उद्यापासून आंदोलन जाहीर करणार आहोत, उद्या गाव, वेळ आणि ठिकाण आम्ही उद्या सकाळी पत्रकार परिषद घेऊन जाहीर करणार आहोत, असंही हाकेंनी माध्यमांशी बोलताना म्हटलंय. ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्यावर अत्यंत तिखट शब्दांत टीका केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी स्वतंत्र मराठा मंत्रालय किंवा कुणबी मंत्रालय स्थापन करण्याची मागणी केली आहे. या मागणीला लक्ष्मण हाके यांनी पूर्णपणे "हास्यास्पद" म्हटले आहे. हाके म्हणाले की, महाराष्ट्र अस्तित्वात आल्यापासून महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा समाजाचेच वर्चस्व राहिले आहे. मंत्रिमंडळात दोन–चार ओबीसी, एससी, एसटी किंवा अल्पसंख्याक मंत्री सोडले, तर अख्खं मंत्रिमंडळ कायमचं मराठा नेत्यांनाच दिलं आहे. असे असताना स्वतंत्र मंत्रालयाची काय गरज? असा सवाल त्यांनी केला.

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रायश्चित्त घ्यावे!; हर्षवर्धन सपकाळ यांची टीका

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)– राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था रसातळाला गेली असून खालच्या स्तरापासून मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यापर्यंत हप्ते पोहचवले जात आहेत. हप्ता वसुलीमुळे पोलीस प्रशासनावर कोणाचाही वचक राहिलेला नाही. राज्यात ड्रग्जचा खुलेआम काळाधंदा सुरु असून हातभट्ट्या आणि विषारी दारुने थैमान घातले आहे. या अवैध धंद्यातूनच पुण्यात विषारी दारुने २२ निष्पाप लोकांचे बळी घेतले आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी याचे प्रायश्चित घ्यावे, अशी टीका करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याला पूर्णवेळ सक्षम गृहमंत्री देण्याची मागणी केली.

शनिवारी टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना सपकाळ यांनी पुण्यातील विषारी दारुकांड प्रकरणी गृह विभागावर तोफ डागली. पुण्यात विषारी दारुने २२ जणांचा बळी घेतल्यानंतर सरकारला जाग आली असून हातभट्या तोडण्याची कारवाई केली जात आहे. या हातभट्ट्या काही रात्रीतून उभ्या राहिलेल्या नाहीत. राज्यात ५०० शहरे आणि ४३ हजार गावखेडी आहेत. या ठिकाणी अवैध धंदे आणि हातभट्या राजरोस सुरु आहेत. गुजरातचे महाराष्ट्रात येणारे ड्रग्ज, जामतारा सारखे प्रकरण तसेच अवैध धंद्याचे रॅकेट राजरोस सुरु असून त्याला गृह विभागाचा आशीर्वाद आहे. पुण्यातील प्रकरणाने सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात असल्याने स्वतःची अब्रु वाचवण्यासाठी आता कारवाईचे नाटक केले जात आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी आंदोलन सुरू केले आहे.

याबद्दल बोलताना सपकाळ म्हणाले, मराठा आंदोलनावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबईतील वाशी येथे मध्यरात्री जरांगे यांना आरक्षण दिल्याचे जाहीर करून गुलाल उधळला होता. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असताना आझाद मैदानातील आंदोलनावेळीही गुलाल उधळला गेला. त्यामुळे या दोन्ही आंदोलनावेळी मुख्यमंत्र्यांनी काय आश्वासन दिले होते, ते जाहीर करावे, अशी मागणी सपकाळ यांनी केली.

मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल तर जातनिहाय जनगणना करावी. त्यातून मराठा समाजासह सर्वच समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो, असेही सपकाळ म्हणाले.

## प्राजक्त तनपुरे यांचा भाजपात प्रवेश; शरद पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)– राज्यात विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरू असून आज महायुतीच्या जागावाटपाची घोषणा होणार असल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, त्याआधी मोठ्या राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते तथा माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भाजपात प्रवेश केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून प्राजक्त तनपुरे हे भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होत्या. राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीमधून प्राजक्त तनपुरे यांनी शेवटच्या क्षणी माघार घेतली होती. तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला ऐनवेळी दुसरा उमेदवार द्यावा लागला होता. एवढंच नाही तर प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीमधून उमेदवारी मागे घ्यावी म्हणून भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे यांनी प्राजक्त तनपुरे यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची भेट घेतली होती. त्यानंतर प्राजक्त तनपुरे यांनी राहुरीच्या पोटनिवडणुकीमधून माघार घेतली होती.

## टीएमसीचे खासदार अभिषेक बॅनर्जीवर हल्ला; बंगालमध्ये खळबळ

### अंडी फेकली, शर्ट फाडला अन् 'चोर, चोर' अशी घोषणाबाजी

कोलकाता दि.३० (वृत्तसंस्था)– टीएमसीचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर काही अज्ञात व्यक्तींनी अंडी फेकत त्यांचा शर्ट फाडला आहे. तसेच यावेळी अभिषेक बॅनर्जी यांच्या दौऱ्यादरम्यान 'चोर, चोर' अशी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पश्चिम बंगालमधील सोनारपूरमध्ये ही घटना शनिवारी घडली आहे. या घटनेनंतर सोनारपूरमध्ये मोठा तणाव निर्माण झाला आहे.

दरम्यान, पश्चिम बंगालमधील सोनारपूर या ठिकाणी अभिषेक बॅनर्जी हे निवडणुकीनंतरच्या हिंसाचारातील पीडितांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी गेले होते. मात्र, यावेळी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाला असल्याचं सांगितलं जात आहे. त्यांच्या या दौऱ्यादरम्यान अभिषेक बॅनर्जी यांच्यावर अंडी फेकत दगडफेक करण्यात आली, तसेच त्यांचा शर्ट फाडण्यात आल्याचा आरोपही टीएमसीने केला आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

खासदार अभिषेक बॅनर्जी हे सोनारपूर या ठिकाणी निवडणुकीनंतर झालेल्या हिंसाचाराच्या घटनेतील पीडितांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी गेले होते. यावेळी काही व्यक्तींनी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या विरोधात 'चोर चोर' अशी जोरदार घोषणाबाजी केली असल्याचा आरोप टीएमसीकडून करण्यात आला आहे. या घटनेमुळे तणाव वाढल्यानंतर अखेर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अभिषेक बॅनर्जी यांना संरक्षण देत आणि हॅल्मेट देत घटनास्थळावरून सुरक्षितस्थळी नेल्याचं व्हिडीओत दिसत आहे.

सोनारपूरमध्ये झालेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाच्या घटनेवर प्रतिक्रिया देताना खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी भारतीय जनता पक्षावर गंभीर आरोप केले आहेत. अभिषेक बॅनर्जी म्हणाले की, "ही घटना भारतीय जनता पक्षाने घडवून आणली आहे. हे सर्व भाजपानेच घडवलं आहे. बघा त्यांनी काय केलं? हे त्यांच्या लोकशाहीचं उदाहरण आहे. त्यांची सत्ता येऊन एक महिना देखील उलटलेला नाही, आता पोलीस कुठेच दिसत नाहीत. त्यांना मला मारायचं होतं. ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. आम्ही निश्चितपणे उच्च न्यायालयाला या घटनेची माहिती देऊ. आम्ही राज्यपालांनाही या घटनेची माहिती देऊ. मी न्यायालयात दाद मागणार आहे", असं अभिषेक बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

## पुण्यात गुन्हेगारी वाढण्यास कारभारी जबाबदार; खासदार सुप्रिया सुळे यांचा आरोप

पुणे दि.३० (प्रतिनिधी)– महाराष्ट्राची गुन्हेगारांची राजधानी अशी ओळख पुण्याची निर्माण होत असून याला पूर्णपणे पुण्याचे कारभारी आणि पोलीस खाते जबाबदार असून पोलिस आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी केली. गेल्या काही महिन्यांपासून पुण्यात वाढत असलेली गुन्हेगारी हे सरकारचे अपयश असल्याची टीका त्यांनी केली.

पुण्यात वाढत असलेल्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर खासदार सुळे यांनी शनिवारी मोदीबागेत प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. काही आठवड्यापूर्वी फुटलेला 'नीट' परीक्षेचा पेपर असो, वाढती महागाई, राज्यातील महिला, अल्पवयीन मुलींवर वाढलेले अत्याचाराच्या घटना याला पूर्णपणे सरकार जबाबदार असल्याचा आरोप खासदार सुळे यांनी केला.

केंद्र सरकारने देशातील गुन्हेगारीबाबतची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये देशात गुन्हेगारीमध्ये पुण्याचा क्रमांक पाचवा तर महाराष्ट्रात पहिला लागत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी गुन्हेगारीमध्ये नागपूर हे पहिल्या क्रमांकावर होते. मात्र आता पहिल्या क्रमांकावर पुणे शहराचा क्रमांक लागला आहे, ही मोठी दुर्दैवी गोष्ट (पान ४ वर)

## विषारी दारु प्रकरणी मृताच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत; गिरीश महाजन यांची माहिती

पिंपरी दि.३० (प्रतिनिधी)– पिंपरी–चिंचवडमधील फ ुगेवाडीतील आणखी दोघांचा विषारी दारुमुळे मृत्यू झाला आहे. त्यामुळे मृतांची संख्या १४ वर पोहोचली आहे. विविध रुग्णालयात नऊ जण दाखल असून त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे. दरम्यान, मृताच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत केली जाणार असल्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. याप्रकरणात अतिउच्च अधिकारी दोषी असल्यास त्यालाही सोडले जाणार नसल्याचा इशारा मंत्री महाजन यांनी दिला आहे.

मंत्री गिरीश महाजन यांनी यांनी शनिवारी फुगेवाडीला भेट दिली. मृताच्या नातेवाईकांशी संवाद साधला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना मंत्री महाजन म्हणाले, मिथेनॉलचे मिश्रण करून विषारी दारूची विक्री केली जात होती. ही दारू प्राशन केल्यामुळे पुणे आणि फुगेवाडीतील १९ जणांचा मृत्यू झाला आहे. निधन झालेल्या कुटुंबातील व्यक्तीच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाखांची मदत केली जाणार आहे. रोजीरोटीसाठी त्यांना महापालिकेत कंत्राटी पद्धतीने सामावून घेतले जाणार आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने १३ जणांना निलंबित केले आहे. दारू विक्रीकडे पोलिसांचे दुर्लक्ष झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांना कडक शब्दात सूचना दिल्या आहेत. यापुढे एक थेंबही दारूची विक्री होणार नाही. यातील एकही दोषी सुटणार नाही, असे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

राजेंद्र सृजन टम्पो (वय ३६, रा. फुगेवाडी), बाबा शेख (वय ४५) या दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. यापूर्वी बारा जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे मृतांची संख्या १४ झाली आहे. खाजप्पा शिंगे (वय ३५), पवन शेरसिंग चव्हाण (वय ३५) यांच्यासह नऊ जण विविध रुग्णालयात दाखल आहेत.

दापोडी पोलिसांनी अटक केलेल्या कर्नेलसिंह विरकाला सरदार म्हणून फुगेवाडी परिसरात ओळखले जाते. मागील ४० वर्षांपासून तो दारू विक्रीचा धंदा करत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. त्याने परिसरात दहशत निर्माण केली होती. त्यामुळे त्याच्या विरोधात कोणी तक्रार करत नव्हते. चाळीत घराच्या वरच्या बाजूला एक खोली बनवून त्यामध्ये तो गावठी दारूचे दुकान चालवत होता. घराच्या बाजूने रेल्वे लाईन गेल्याने लोक त्याच्याकडून दारू घेऊन रेल्वे रुळाच्या आजूबाजूला दारू प्राशन करित असत, मात्र मागील तीन महिन्यांपूर्वी रेल्वे विभागाने रेल्वे रुळाच्या दोन्ही बाजूला पत्रे लावले. त्यामुळे लोक त्याच्या घराजवळ दारू प्राशन करित होते, असे स्थानिकांनी सांगितले.

## राज्याला वाऱ्यावर सोडून महाराष्ट्र सरकारचे व्यवहारावर लक्ष- संजय राऊत

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)– सरकारकडून राज्याला वाऱ्यावर सोडून व्यवहारावर लक्ष केंद्रित केले जात आहे. पण आम्ही त्यावर काही बोलणार नाही, कारण त्यामुळे महाराष्ट्राची बदनामी होईल. संघ आता मजबूत आहे त्यांनी मोदींना विचारायला हवे पाकव्याप्त काश्मीरमध्ये झेंडा का फडकवला नाही, असा सवाल संघाने पंतप्रधान नरेंद्र मोदींना केला पाहिजे, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, विधान परिषदेच्या दोन जागांवर आमची चर्चा सुरू आहे. निवडणूक बिनविरोध होऊ नये यासाठी आम्ही निवडणूक लढवत आहे. स्वबळावर कोणीही निवडणूक जिंकू शकत नाही.

संजय राऊत म्हणाले की, पुणे, पिंपरी चिंचवड या भागामध्ये विषारु दारू पिल्याने १६ लोकांचा मृत्यू झाला आहे. गेल्या काही काळापासून पुण्यामध्ये अवैध धंदे, गुन्हेगारीचा उद्रेक सुरू आहे. पुणे पोलिस आयुक्तांनी गुन्हेगारी वाढू नये म्हणून रात्री १० नंतर पुणे बंदचे आदेश काढले आहेत. कालच दारू कांड पाहिल्यावर मला असे वाटते की पोलिस आयुक्तांना आता दिवसासुद्धा पुणे बंद करावे लागेल.

संजय राऊत म्हणाले की, पुण्यात विषारी दारू मिळते आणि लोकं ती पित आहेत म्हणजे हे नेटवर्क संपूर्ण महाराष्ट्रात आहे. मुख्यमंत्र्यांच्या आशीर्वादाने गेली ७ वर्षे हे नेटवर्क सुरू आहे ते आता म्हणताय (पान ४ वर)

# इतिहास : तंबाखू विरोधाचा

जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्य देशांनी तंबाखू वापराच्या वेगाने पसरणाऱ्या साथीकडे आणि त्यापासून उद्भवणाऱ्या रोगराई तसेच मृत्यूंकडे जागतिक नागरिकांचे लक्ष वेधण्यासाठी ७ एप्रिल १९८८ हा दिवस 'जागतिक धुम्रपान विरोधी दिन' म्हणून साजरा करण्याचे ठरवले. प्रत्येक नागरिकाला आरोग्य प्राप्त करण्याचा व निरोगी आयुष्य जगण्याचा अधिकार आहे व म्हणूनच तंबाखूमुळे होणारे प्रतिबंध करण्याजोगे दुष्परिणाम टाळण्यासाठी त्यांनी एकत्रितपणे प्रयत्नही करायला हवेत हा विचार व्हावा आयोजनामागे होता. सात एप्रिल हा 'जागतिक आरोग्य दिन' असल्याने १९८८ नंतर 'जागतिक धुम्रपानविरोधी दिन' ३१ मे रोजी साजरा करण्याचे ठरविण्यात आले. यंदाही या दिवशी तंबाखूविषयक बरीच चर्चा झाली. तरी अनेक मुद्दे दुर्लक्षित राहिले आहेत. इ.स. पूर्व ६००० वर्षांपासून तंबाखूची लागवड व वापर याविषयीची माहिती उपलब्ध आहे. तंबाखू हे नगदी पीक असल्याने इंग्लंडसारख्या साम्राज्यवादी देशांनी त्यांच्या मागास देशातील वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणात त्याची लागवड केली. तंबाखूतील निकोटीन हे द्रव्यच तंबाखूसेवन करणाऱ्याला व्यसनाधीन बनवत असते. त्यामुळे तंबाखू तोंडात ठेवली काय, तपकिरीतून नाकात ओढली काय, मिश्रीच्या रुपात दात घासायला वापरली काय किंवा बिडी-सिगारेट हुक्का असा धुम्रपानाच्या पद्धतीने शरीरात घेतली काय, त्यामुळे होणारे सर्व मानसिक-शारीरिक परिणाम हे निकोटीनमुळेच होत असतात. निकोटीनमुळे सुरुवातीला व्यक्तीला ताजेतवाने वाटते, पण नंतर मात्र त्याच्या मज्जासंस्थेचे काम थंडावते. शरीराच्या जवळजवळ सर्व इंद्रियांवर तंबाखूमुळे दुष्परिणाम होतात.

गुटखा खाणाऱ्या लोकांना तोंड उघडायला त्रास व्हायला लागतो. नंतर तोंडात कर्करोग होतो. धुम्रपान करणाऱ्यांना फुफ्फुसाचा कर्करोग होतो. तंबाखूचे व्यसन करणाऱ्या व्यक्तीचे आयुष्यमान तंबाखू न घेणाऱ्या व्यक्तीपेक्षा कमी असते. जगातील सर्व मृत्यूंचे कारणे बघितल्यास लक्षात येते की, तंबाखू हे मृत्यूचे दुसरे महत्त्वाचे कारण आहे. तंबाखूमुळे दरवर्षी जगात ५० लाख लोक मृत्युमुखी पडतात. दर दहा पुरुषांमागे एकाचा मृत्यू तंबाखूमुळे होतो. धुम्रपानाचे प्रमाण असेच वाढत राहिले तंबाखूमुळे दरवर्षी १ कोटी व्यक्तींचे प्राण जातील. सध्या तंबाखूचा वापर करणाऱ्या ६५ कोटी व्यक्तींचा मृत्यू आज ना उद्या तंबाखूमुळे होऊ शकतो.

धुम्रपानामुळे होणारा फुफ्फुसाचा वा श्वसनसंस्थेच्या इतर भागांचाकर्करोग ही जगाला भेडसवणारी एक महत्त्वाची आरोग्य समस्या आहे. सध्या जगात सर्वात जास्त प्रमाणात हाच कर्करोग आढळून येतो. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे ५१% रुग्ण विकसनशील राष्टांमध्ये आढळून येतात. यात ७५% रुग्ण पुरुष असतात. श्वसनसंस्थेच्या कर्करोगाच्या गटातील एकूण रुपणांपैकी ८५% पुरुष रुग्णांमध्ये व ४६% स्त्री रुग्णांमध्ये कर्करोगाचे कारण धुम्रपान ही असते. या कर्करोगाच्या एकूण रुग्णापैकी १/३ रुग्ण वयाच्या पासष्ठ वर्षांआधी मरण पावतात. भारतात झालेल्या एका अभ्यासानुसार धुम्रपान करणाऱ्या व्यक्तींमध्ये फुफ्फुसाचा कर्करोग होण्याची शक्यता धुम्रपान करणाऱ्या व्यक्तीपेक्षा ८.६ पट जास्त असते.

तंबाखूचा वापर कमी व्हावा यासाठी जागतिक आरोग्य संघटना मोलाचे कार्यरत करित आहेत. 'Somking or health - Choice is yours असे घोषवाक्य याआधी जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने जागतिक आरोग्य संघटनेने दिले होते. तंबाखू मुळे ज्ञानेंद्रिये, पचनसंस्था, श्वसनसंस्था, मज्जासंस्था, रक्ताभिसरण संस्था तसेच उत्सर्जन प्रजनन संस्था या सर्वांवरच दृष्परिणाम होतात. म्हणून जागतिक आरोग्य संघटना दरवर्षी ३१ मे ला एखादे विशिष्ट्य घोषवाक्य देऊन त्या त्या समस्येकडेलक्ष वेधत असते.

जागतिक आरोग्य संघटनेने तंबाखूच्या वापरावर नियंत्रण आणण्यासाठी आरोग्य व्यावसायिकांच्या भूमिकेवर लक्ष केंद्रित केले आहे. आरोग्य व्यावसायिक म्हणजे फक्त डॉक्टर नव्हेत, तर यात परिचारिका, दंतवैद्य, प्रसविका, भौतिकोपचारतज्ज्ञ, औषधीशाखज्ञ तसेच इतर निगडीत व्यावसायकांचाही समावेश होतो. तंबाखूचा वापर कमी करण्यासाठी विविध उपाययोजना कराव्या लागतील. यात तंबाखू उत्पादनांचा वापर थांबवण्यासाठी किमतीवर नियंत्रण ठेवावे लागेल. कायदे करावे लागतील, या बरोबरच तंबाखूचे व्यसन लागूच नये यासाठी लोकशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करावे लागतील.

आरोग्य व्यावसायिक या सर्व प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये त्यांचा शिरकाव असतो. समाजातील बहुतांश लोक आरोग्य व्यावसायिकांच्या संपर्कात येतात. लोकांमध्ये वर्तणूकविषयक बदल ते घडवून आणू शकता. तंबाखूचे दुष्परिणाम, व्यसन सोडवण्यासाठीचे उपाय याची माहिती ते लोकांना देऊ शकतात. आरोग्य व्यावसायिकांनी धुम्रपानाच्या दुष्परिणामांषियी आणि ते सोडण्यामुळे होणाऱ्या फायद्यांविषयी समुपदेश न केल्यास अनेक व्यक्ती व्यसनाला रामराम ठोकू शकतात. धुम्रपानाचे प्रमाण कमी करण्याचा हा सर्वात स्वस्त आणि प्रभावी उपाय असल्याचे अनेकशास्त्रीय अभ्यासातून सिद्ध झालेले आहे. आरोग्य व्यावसायिक स्वतःच्या वर्तनातून एक आदर्श निमर्ण करु शकतात. त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेचा वापर करुन ते राजकारण्यांना तंबाखूविरोधी कायदे करण्यासही भाग पडू शकतात. भारतातील आरोग्य व्यावसायिक जागतिक आरोग्य संघटनेची ही अपेक्षा पूर्ण करु शकतील का, हा कळीचा प्रश्न आहे. वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये धुम्रपानाच व तंबाखूसेवनाचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यामुळे धूम्रपान वा तंबाखूमुक्त जगाचे स्वप्न पाहायचे असेल तर प्रथम या डॉक्टरांना तंबाखूचा, वापर थांबवावा लागेल. स्वतः सिगारेटचा धूर सोडत रुग्णाला धुम्रपान सोडण्याचा सल्ला दिल्यास त्याचा काहीच उपयोग होणार नाही. 'दिव्याखाली अंधार' ही म्हण याबाबत आरोग्य व्यावसयिकांसाठी अगदी चपखल बसते. जॉर्ज बर्नार्ड शॉला कोणीतरी सिगारेट सोडण्याचा सल्ला दिला. त्यावर तो म्हणाला, 'त्यात काय एवढं मोठं ? मी आतापर्यंत ५२ वेळा सिगारेट सोडलीय' एकूण व्यसनी लोकांची अवस्था 'इक ठोकरसे अभी सँभले नही थे के फिर खाई ठोकर सँभलते संभलते' अशी असते. त्यामुळेच व्यसन सोडण्यासाठी त्या व्यक्तीने निर्धारपूर्वक प्रयत्न करायला हवेत. या प्रयत्नात त्यांना आरोग्य व्यावसायिक, त्यांचे कुटुंबीय, शासन तसेच स्वयंसेवी संस्था या साऱ्यांचे सहकार्य मिळाले तरच जागतिक आरोग्य संघटनेचे तंबाखूमुक्त जगाचे स्वप्न साकार होऊ शकते.

# अहिल्यादेवी होळकर : समाजकल्याणाची दीपस्तंभ



**भारतीय** इतिहासात अनेक पराक्रमी राजे, दूरदृष्टी असलेले प्रशासक आणि लोकहितासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्ती होऊन गेल्या; परंतु जनतेच्या मनावर मातृत्वाच्या भावनेने अधिराज्य गाजविणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. ३१ मे हा दिवस त्यांच्या जयंतीदिनाच्या रूपाने संपूर्ण देशात आदराने साजरा केला जातो. मराठेशाहीच्या इतिहासात प्रशासन, न्याय, समाजकारण आणि लोककल्याण यांचा अद्भुत संगम घडवून आणणाऱ्या अहिल्यादेवी या केवळ एका संस्थानाच्या राणी नव्हत्या, तर त्या लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या एक संवेदनशील माता होत्या. त्यांचे संपूर्ण जीवन हे कर्तव्य, त्याग, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेचा आदर्श मानले जाते. त्यांच्या कार्याचा प्रभाव आजही समाजजीवनावर जाणवतो. स्त्रीशक्तीचे एक प्रभावी प्रतीक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. समाजातील दुर्बल घटकांना आधार देत न्याय आणि सुशासनाचा आदर्श उभा करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिमत्त्व जितके प्रेरणादायी आहे तितकेच अभ्यासपूर्ण देखील आहे.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. ग्रामीण वातावरणात वाढलेल्या अहिल्यादेवींना बालपणापासूनच संस्कार, कष्ट आणि समाजकल्याणाचे शिक्षण मिळाले. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची परंपरा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी आपल्या कन्येला शिक्षण देण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात संवेदनशीलता, विचारशीलता आणि निर्णयक्षमता विकसित झाली. बालपणापासूनच त्यांना ग्रंथांचे वाचन, लोकांशी प्रेमाने वागणे आणि संकटात धैर्य राखणे यांचे संस्कार मिळाले होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व साधेपणा आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण होते.

एक प्रसंग त्यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारा ठरला. मराठा साम्राज्यातील पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर हे पुण्याकडे जात असताना चौंडी येथे थांबले होते. त्या वेळी त्यांनी मंदिरात भक्तिभावाने पूजा करणाऱ्या अहिल्याबाईंचे दर्शन घेतले. त्यांच्या शांत, संयमी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन मल्हाररावांनी आपला पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह करण्याचा निर्णय घेतला. अल्पवयातच त्यांचा विवाह इंदूरच्या होळकर घराण्यात झाला आणि त्या होळकर घराण्याच्या सून बनल्या. विवाहानंतर त्यांनी केवळ राजघराण्याच्या परंपरा जपल्या नाहीत, तर प्रशासन आणि लोककल्याणाची जाणही आत्मसात केली. मल्हारराव होळकर हे पराक्रमी, दूरदृष्टी असलेले आणि अनुभवी प्रशासक होते. त्यांनी अहिल्यादेवींना राज्यकारभाराचे प्रशिक्षण दिले. युद्धनीती, न्यायदान, आर्थिक व्यवहार, प्रजेच्या अडचणी आणि प्रशासनातील बारकावे यांचे ज्ञान त्यांनी अहिल्यादेवींना दिले. त्या काळात स्त्रियांना राज्यकारभारात स्थान मिळणे दुर्मीळ होते; मात्र अहिल्यादेवींनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर हे आव्हान समर्थपणे स्वीकारले. त्यांना लोकांच्या समस्या समजून घेण्याची आणि त्यावर संवेदनशीलतेने उपाय करण्याची विलक्षण क्षमता होती.

अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. त्यांचे पती खंडेराव होळकर यांचा कुंभेरच्या युद्धात मृत्यू झाला. त्या वेळी सती जाण्याचा समाजाचा दबाव होता; परंतु मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून रोखले. हा निर्णय भारतीय इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण त्यातून एका महान राज्यकर्तीचा उदय झाला. पुढे मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि काही काळानंतर त्यांच्या पुत्राचाही मृत्यू झाला. सततच्या वैयक्तिक दुःखांनी खचून न जाता अहिल्यादेवींनी धैर्याने राज्यकारभाराची सूत्रे हातात घेतली. एका स्त्रीने इतक्या प्रतिकूल परिस्थितीत नेतृत्व स्वीकारणे ही त्या काळात अत्यंत धाडसी बाब होती.

अहिल्यादेवी होळकर यांनी इंदूर संस्थानाचा कारभार अत्यंत कुशलतेने चालविला. त्यांनी महेश्वर ही आपली राजधानी केली. नर्मदेच्या काठी वसलेले महेश्वर त्यांच्या कारकिर्दीत सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्ट्या समृद्ध झाले. त्यांनी राज्यातील प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त आणली. त्यांच्या दरबारात न्यायदान अत्यंत निष्पक्षपणे केले जाई. गरीब असो किंवा श्रीमंत, सर्वांना समान न्याय मिळत असे. त्या स्वतः जनतेच्या तक्रारी ऐकत असत. लोकांच्या समस्या समजून घेऊन तत्काळ उपाययोजना करण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला स्थान नव्हते. अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोककल्याणाची भावना. त्यांनी प्रजेच्या सुखाला सर्वोच्च प्राधान्य दिले. शेतकऱ्यांसाठी सिंचन व्यवस्था, विहिरी, तलाव आणि धरणांची उभारणी करण्यात आली. व्यापाऱ्यांना सुरक्षित वातावरण दिले गेले. व्यापार आणि उद्योगांना प्रोत्साहन दिल्यामुळे आर्थिक प्रगती झाली. महेश्वरी साड्यांच्या परंपरेला त्यांनी चालना दिली. आजही महेश्वरी साडी ही भारतीय वस्त्रसंस्कृतीचा अभिमान मानली जाते. अहिल्यादेवींनी महिलांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षेसाठी अनेक निर्णय घेतले. स्त्रियांच्या समस्या समजून घेऊन त्यांना आधार देण्याचे कार्य त्यांनी केले. विधवा महिलांना समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. स्त्रियांना मालमत्तेचे अधिकार मिळावेत, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी त्या जागरूक होत्या. स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून समाजनिर्मितीत तिची महत्त्वाची भूमिका आहे, हा संदेश त्यांच्या जीवनातून दिसून येतो. अहिल्यादेवी होळकर यांची न्यायव्यवस्था अत्यंत प्रभावी होती. त्यांच्या दरबारात अन्यायाला मुळीच थारा नव्हता. त्या प्रत्येक प्रकरणाचा बारकाईने अभ्यास करून निर्णय घेत असत. लोकांना न्याय मिळावा यासाठी त्या कटिबद्ध होत्या. त्यांचा न्याय निष्पक्ष आणि मानवतावादी होता. त्यामुळे जनतेमध्ये त्यांच्याबद्दल अपार आदर निर्माण झाला. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवले. चुकीचे वर्तन करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जाई. अहिल्यादेवींच्या राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती. त्यांनी सैन्य व्यवस्था मजबूत ठेवली. शत्रूंचा सामना करण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेतले. परंतु युद्धापेक्षा शांततेला आणि विकासाला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांच्या प्रशासनात आर्थिक शिस्त होती. राज्याच्या उत्पन्नाचा उपयोग लोककल्याणासाठी करण्यात येत असे. खर्चात काटकसर आणि जनहिताचा विचार हा त्यांच्या प्रशासनाचा पाया होता.

अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वात धार्मिकता होती; परंतु ती अंधश्रद्धेवर आधारित नव्हती. त्यांचा धर्म म्हणजे मानवसेवा होता. गरीब, गरजू आणि पीडित लोकांना मदत करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी अनेक दानधर्म केले. अन्नछत्रे चालवली. यात्रेकरू, साधू-संत आणि गरजू लोकांसाठी निवासव्यवस्था केली. त्यांचे जीवन अत्यंत साधे होते. राजसत्ता असूनही त्यांनी वैभवापेक्षा सेवेला महत्त्व दिले. त्यांच्या जीवनातील साधेपणा आजच्या काळातही प्रेरणादायी वाटतो. त्या राजवाड्यात राहत असल्या तरी त्यांच्या वागण्यात अहंकार नव्हता. त्या सामान्य लोकांशी प्रेमाने संवाद साधत असत. जनतेच्या दुःखात सहभागी होणे आणि त्यांच्या समस्या स्वतः समजून घेणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच लोकांनी त्यांना 'लोकमाता' ही उपाधी दिली.

अहिल्यादेवी होळकर यांनी शिक्षण आणि संस्कृतीच्या जतनासाठीही महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी विद्वान, कवी, पंडित आणि कलाकारांना आश्रय दिला. महेश्वर हे त्या काळात संस्कृती आणि साहित्याचे केंद्र बनले. सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याबरोबरच त्यांनी लोककलेलाही प्रोत्साहन दिले. समाजातील नैतिक मूल्ये टिकून राहावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतीय स्त्रीशक्तीचा विचार केला तर अहिल्यादेवींचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. त्यांनी संकटांना न घाबरता नेतृत्व स्वीकारले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून जनतेच्या हितासाठी कार्य केले. त्यांचे जीवन हे संघर्षातून उभे राहिलेल्या यशाचे उदाहरण आहे. आजच्या महिलांसाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. आत्मविश्वास, निर्णयक्षमता, कर्तव्यनिष्ठा आणि लोकसेवा या गुणांचा आदर्श त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून दिसतो.

आजच्या काळात प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि लोकाभिमुखता यांची आवश्यकता अधिक जाणवते. अशा वेळी अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य मार्गदर्शक ठरते. त्यांनी सत्ता ही जनसेवेचे साधन मानली. आज अनेक ठिकाणी भ्रष्टाचार, अन्याय आणि स्वार्थी राजकारण दिसून येते; परंतु अहिल्यादेवींच्या प्रशासनात प्रामाणिकपणा आणि नैतिकता सर्वोच्च होती. म्हणूनच त्यांच्या कार्याचा अभ्यास आजही प्रशासनशास्त्र आणि समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. अहिल्यादेवींच्या कार्यातून महिला सक्षमीकरणाचा प्रभावी संदेश मिळतो. त्या काळात स्त्रियांना अनेक सामाजिक बंधने होती; तरीही त्यांनी आपल्या कर्तृत्वाने इतिहासात अजरामर स्थान मिळविले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की स्त्री सक्षम असेल तर ती राज्यकारभार, समाजकारण आणि नेतृत्व या सर्व क्षेत्रांत यशस्वी होऊ शकते. त्यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणास्त्रोत आहे.

भारतीय संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्यात अहिल्यादेवींचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यांनी केवळ धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार केला नाही, तर सांस्कृतिक एकात्मतेलाही बळ दिले. उत्तर ते दक्षिण भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांवर त्यांनी कामे केली. यामुळे देशाच्या सांस्कृतिक ऐक्याला चालना मिळाली. त्यांच्या कार्यातून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दिसून येते. महेश्वर नगरीला त्यांनी दिलेली सांस्कृतिक ओळख आजही टिकून आहे. नर्मदेच्या घाटांवर उभे असलेले मंदिरसमूह, राजवाडे आणि वास्तू त्यांच्या दूरदृष्टीची साक्ष देतात. महेश्वरी वस्त्रोद्योगाला त्यांनी दिलेले प्रोत्साहन आजही हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचे साधन आहे. स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देऊन आर्थिक स्वावलंबन वाढविण्याचा त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रगत होता.

अहिल्यादेवींच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संकटसमयी दाखवलेले धैर्य. सततच्या कौटुंबिक दुःखांनंतरही त्यांनी खचून न जाता जनतेच्या हितासाठी काम केले. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून कर्तव्याला प्राधान्य देणे ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची महानता होती. त्यांच्या जीवनातून आपल्याला संकटांवर मात करून पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.

त्यांच्या प्रशासनात धार्मिक सहिष्णुता होती. विविध समाजघटकांना त्यांनी समान वागणूक दिली. कोणत्याही धर्माविषयी द्वेषभावना न ठेवता सर्वांच्या श्रद्धेचा आदर केला. त्यांच्या या दृष्टिकोनामुळे समाजात सौहार्द आणि शांतता टिकून राहिली. आजच्या काळात सामाजिक सलोखा टिकविण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज अधिक आहे. अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य केवळ इतिहासापुरते मर्यादित नाही. आजही त्यांच्या विचारांची आणि कार्यपद्धतीची उपयुक्तता जाणवते. चांगले प्रशासन कसे असावे, जनतेच्या गरजा कशा ओळखाव्यात, समाजातील दुर्बल घटकांना कसा आधार द्यावा आणि सत्ता लोककल्याणासाठी कशी वापरावी याचे आदर्श उदाहरण म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. म्हणूनच त्यांना भारतीय इतिहासातील सर्वोत्तम राज्यकर्त्यांपैकी एक मानले जाते.

महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यांच्या कार्याचा अभ्यास करून नवीन पिढीला प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक ठिकाणी व्याख्याने, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. ही जयंती केवळ स्मरणाचा दिवस नसून आदर्श जीवनमूल्यांचा विचार करण्याची संधी आहे. आजच्या समाजात नैतिक मूल्यांची घसरण, वाढती असमानता आणि स्वार्थी वृत्ती यांसारख्या समस्या दिसून येतात. अशा परिस्थितीत अहिल्यादेवींचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांनी लोकसेवा, न्याय, प्रामाणिकपणा आणि मानवतेच्या मूल्यांना प्राधान्य दिले. त्यांच्या जीवनातून समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळते. अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी आपल्या कार्याने स्त्रीशक्तीचा नवा आदर्श निर्माण केला.

लोककल्याणकारी प्रशासन, धार्मिक सहिष्णुता, न्यायप्रियता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. त्या केवळ एका राज्याच्या राणी नव्हत्या, तर जनतेच्या हृदयातील लोकमाता होत्या. त्यांच्या कार्याचा वारसा आजही समाजाला प्रेरणा देत आहे. ३१ मे रोजी त्यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या विचारांचे स्मरण करणे आवश्यक आहे. समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे, न्याय आणि समानतेसाठी कार्य करणे, स्त्रीसन्मान जपणे आणि लोकहिताला प्राधान्य देणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे भारतीय संस्कृतीतील सेवा, त्याग आणि मानवतेच्या महान परंपरेचे प्रतीक आहे. त्यांचा आदर्श प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी राहील आणि लोककल्याणाच्या कार्यासाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.

– डॉ. राजेंद्र बगाटे

# ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस : तंबाखू, खैनी, गुटखा,खर्रा खाने 'घातकच' परंतु खावून थुंकणे 'महाघातक'

**संपूर्ण** जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो. जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला (सुझाव) देण्यात आला. ८ एप्रिल १९८८ ला डब्ल्यूएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो. डब्ल्यूएचओने तंबाखू सेवनाने होणाल्या २५ प्रकारच्या शारीरिक बिमाया पहाता व ४० प्रकारचे कॅन्सर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषीत केली. डब्ल्युएचओच्या माहिती नुसार जगात तंबाखूने किंवा धुम्रपान केल्याने दरवर्षी ७५ लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो. कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय. मानवाची जगण्याची दशा, दीशा ठरवीने हे मनवाच्या मनावर व हातामध्ये असते.परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वत:ला व परीवाराला घातक सीध्द होवू शकते याला नाकारता येत नाही. तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो. ह्याबाबी मानवाने स्वत: समजुन घ्यायला हव्यात.कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते. सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे? मध्यंतरी महाराष्ट्रात दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चर्चेला मोठे उधाण आले होते. या चर्चेचा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात. याव्यतीरीक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसन मुक्तीसाठी कार्य करतांना दीसतात.परंतु सरकार




स्वत:हुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही.कारण नशेली (मद्द, तंबाखू,खैनी, सिगारेट, बिडी, गुटखा, गांजा इत्यादी) वस्तुपासून राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो. यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचा जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-१९च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुर्ढायांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली.यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला.यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी, तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा, गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या परंतु नशासोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही. लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती.परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता ३ कीलो मिटरपर्यंत लोक रांगेत उभे होते. अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही. प्रत्येकानी जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही. कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्याशीवाय रहाणार नाही. याला म्हणतात' अती तिथे माती'. त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे. अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे? कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला 'छल्ली' करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. उदाहरण द्यायचे झाले तर बादाम ९०० रूपये किलो यांच्या तुलनेत गुटखा ४३०० रूपये किलो, शुद्ध तुप ६०० रूपये किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रूपये किलो, सफरचंद १०० रूपये किलो यांच्या तुलनेत सुपारी६०० रूपये किलो,दुध ५० रूपये लिटर यांच्या तुलनेत दारू ५६० रूपये लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.कोव्हीड-१९च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा, गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती. यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल. करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते.या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी. सध्याच्या परीस्थितीत युवापिढी 'धुम्रपानाच्या' आहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे 'मृत्यूच्या रांगेत'उभे रहाल्यासारखे आहे.याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.सरकारने कीतीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी. कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक बिर्मायां व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे. आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील त्याचप्रमाणे आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही माझी आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे.याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण 'संकल्प' करूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.

–रमेश कृष्णराव लांजेवार

# तंबाखू सेवन विरोधी तंबाखू सेवन म्हणजे साक्षात विष घेणेच होय

**तंबाखू** सेवन अत्यंत विषारी व प्राणघातक आहे. चुनामिश्रित तंबाखू ने कॅन्सर सारखे आजार वाढले आहेत.विडी ओढणे,सिगारेट ओढणे, गुटखा यामुळे घशाचे, श्वास नॅलिकेचे विविधआजार वाढत आहेत. आतड्याचे आजार, तोंडाचा आजार, ओठांचा कॅन्सर, जीभ रठ पडणे, स्पष्ट बोलता न येणे, जीभ काळी पडणे, वेळ काळ प्रसंगी जीभ कापून टाकावी लागते, तंबाखू खाणे, विडी, सिगारेट ओढणे याने तोंडाला दुर्गंधी येते, एवढे सर्व माहीत असतांना ही आज डॉक्टर्स, इंजिनिअर, अधिकारी, कर्मचारी, गवंडी कामगार, कामकरी, कष्टकरी, विशेषतः महिला वर्ग तंबाखू व चुना मिश्रण करून जिभेखाली ठेवतात,किंवा गालात आतून ठेवतत व कॅन्सर सारख्या महाभयानक आजाराला निमंत्रण देतात.



तंबाखू मग ती खाण्याची असो की, विडी, सिगारेटमधून ओढण्याची असो ती घातक व मारक आहे,निकोटीन हे अत्यंत घातक रसायन असते,जे तोंडापासून ते लहान व मोठ्या आतड्यापर्यंत ची आतडी खराब करते, व कॅन्सर आजारपर्यंत नेऊन व्यक्तीला मरण्यास प्रवृत्त करते.भारतात महिला व पुरुष मोठ्या प्रमाणात तंबाखू व चुना मिश्रण खातात. ज्यामुळे तोंडात छिद्र ही पडतात, जीभ काळपट पडते, घसा नेहमी सुजलेला असतो. तंबाखू मुळे जगात दरवर्षी ५०लक्ष लोकं मृत्यूमुखी पडतात,भारतात १५लक्ष व्यक्ती दरवर्षी मृत्यूमुखी पडतात. जागतिक आरोग्य संघटनेने तंबाखू खाणाऱ्यांचा सर्व्हे केला, त्यांच्या माहितीनुसार जगात तंबाखू खाणाऱ्यांची संख्या दिवस न दिवस सारखी वाढत आहे, हे प्रमाण असेच राहिले तर त्यांच्या मते वर्ष २०३०पर्यंत तंबाखू खाऊन मरणारे १कोटी पर्यंत पोहचतील. तंबाखू मध्ये केवळ निकोटिन हे भयानक रसायन असे नाही तर हायड्रोजन सायनाईट(एक विषारी पदार्थ), अमोनिया, आर्सेनिक (मुंग्यांना मारण्याचे औषध),कार्बन मोंनाक्साईड, नेट थलीन असे किती तरी घातक घटक असतात.त्यामुळे तंबाखू सेवन व तंबाखू विडी, सिगारेटच्या द्वारे ओढणे तात्काळ त्यागायला हवे. भारतात सर्वाधिक कॅन्सर तंबाखू खाणारे व विडी, सिगारेट ओढणारे यांना आहे. विडी,सिगारेट ओढणारे किंवा तंबाखू खाणाऱ्यांचे हात-पाय काळे पडत आहेत. यामुळें बऱ्याच नागरिकांचे हात-पाय कापावे लागत आहेत.नवी पिढी ही मोठ्या प्रमाणात सिगारेट ओढण्याच्या आहारी जात आहे.व ऐन तारुण्यात ते कॅन्सर सारखा आजार ओढवून घेत आहेत.

देशातील एक कर्तृत्व सम्पन्न शक्ती लयाला जात आहे. विडी, सिगारेट ओढणे किंवा तंबाखू सेवन करणे तात्काळ सोडून त्याऐवजी बडी शोप खाणे,पान ही मर्यादित खाणे,लवंग,विलायची चघळणे अशा सवयी योग्य आहे.कुटुंबाचा ,देशाचा व समाजाचा विचार करावा व तंबाखू कोणत्याही रूपात सेवन करणे टाळू या.

**– धोंडिरामसिंह राजपूत**

# ‘स्थानिक स्वराज्य’च्या निमित्ताने महायुतीतच राजकीय वर्चस्वाची चाचणी

**विधान** परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करताच दक्षिण महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींना अभूतपूर्व वेग आला आहे. सांगली-सातारा जिल्ह्यांत आचारसंहिता लागू झाल्याने दोन्ही आघाड्यांमधील नेत्यांची धाकधूक वाढली आहे.

दक्षिण महाराष्ट्राच्या राजकारणात अत्यंत महत्त्वाचा आणि सत्तेच्या समीकरणांना कलाटणी देणारा मानला जाणारा सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ पुन्हा एकदा राजकीय संघर्षाच्या केंद्रस्थानी आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करताच, दोन्ही जिल्ह्यांत आचारसंहिता लागू झाली असून राजकीय हालचालींना अभूतपूर्व वेग आला आहे. पक्षीय सूत्रांकडून मिळणाऱ्या माहितीनुसार, यंदाची निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांसाठी प्रतिष्ठेची ठरणार असली, तरी खरी आणि अटीतटीची लढाई महायुतीतील अंतर्गत पक्षांमध्येच रंगण्याची चिन्हे आहेत. या मतदारसंघाचे वैशिष्ट्य म्हणजे, येथील मतदार हे थेट सामान्य जनता नसून नगरपालिकांचे नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे सभापती आणि महानगरपालिकांचे नगरसेवक हे स्थानिक लोकप्रतिनिधी असतात.त्यामुळे ही निवडणूक थेट जनमताऐवजी स्थानिक राजकीय तडजोडी, गणिते आणि गटबाजीवर पूर्णपणे अवलंबून असते. सांगली आणि सातारा या दोन्ही जिल्ह्यांतील सहकार क्षेत्र, साखर कारखानदारी, बँका, नगरपालिका आणि ग्रामीण भागातील स्थानिक सत्ता समीकरणे यावेळी निर्णायक ठरणार असल्याचे स्पष्ट मत राजकीय निरीक्षकांनी व्यक्त केले आहे.

सध्या राज्यात महायुतीची सत्ता असल्यामुळे सत्ताधारी गोटातून या मतदारसंघासाठी भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात उमेदवारी मिळवण्यासाठी तीव्र चुरस निर्माण झाली आहे. सांगली जिल्ह्यात भाजपकडे काही माजी आमदार, जिल्हा परिषद पातळीवरील प्रभावी नेते आणि सहकार क्षेत्रातील वजनदार चेहरे इच्छुक आहेत. गेल्या काही वर्षांत साताऱ्यातही भाजपने आपले संघटन मजबूत केल्यामुळे हा मतदारसंघ स्वतःकडेच ठेवण्यासाठी भाजप पूर्ण ताकदपणाला लावत आहे. मात्र, महायुतीमध्ये खरी अडचण जागावाटपावरून निर्माण होण्याची शक्यता आहे. दोन्ही जिल्ह्यांतील सहकार क्षेत्रावर आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अजित पवार गटाचे संख्याबळ आजही काही भागात प्रभावी आहे, त्यामुळे या जागेवर त्यांचा दावा भक्कम मानला जात आहे. दुसरीकडे, पश्चिम महाराष्ट्रात आपले राजकीय अस्तित्व आणि ताकद सिद्ध करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेलाही या जागेची तीव्र आवश्यकता वाटत आहे. या अंतर्गत संघर्षामुळे उमेदवारीचा तिढा सोडवण्यासाठी आणि जागावाटप अंतिम करण्यासाठी आगामी काळात मुंबईत वरिष्ठ नेत्यांच्या अनेक महत्त्वाच्या बैठका होण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडीकडून या जागेसाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट हे दोन प्रमुख दावेदार आहेत. सांगली जिल्ह्यात काँग्रेसचे अजूनही काही नगरपालिका, बाजार समित्या आणि स्थानिक संस्थांमध्ये मजबूत जाळे आहे, त्यामुळे ही जागा आपल्याच पारड्यात पडावी यासाठी काँग्रेस उत्सुक आहे. दुसरीकडे, साताऱ्यात शरद पवार गटाचा राजकीय प्रभाव आजही कायम आहे.आघाडीमध्ये उमेदवारीवरून सौम्य संघर्ष असला, तरी अंतिम तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काँग्रेसकडून एखाद्या माजी मंत्र्याशी संबंधित किंवा अनुभवी आणि जुन्या चेहऱ्याला संधी दिली जाऊ शकते; तर शरद पवार गट स्थानिक सहकारी संस्थांशी निगडित आणि थेट मतदारांच्या संपर्कात असलेल्या चेहऱ्याला प्राधान्य देण्याच्या तयारीत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या दोन्ही पक्षांच्या भूमिकेकडे लक्ष ठेवून आहे.

राजकीय वतुर्ळात सध्या दोन्ही जिल्ह्यांतील पारंपरिक राजकीय घराणी, सहकारी साखर कारखान्यांचे संचालक आणि नगरपालिका पातळीवरील किंगमेकर नेत्यांच्या नावांची चाचपणी सुरू असली, तरी अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही. या निवडणुकीत ‘क्रॉस व्होटिंग’ म्हणजेच पक्ष सोडून विरोधी उमेदवाराला मतदान करणे हा सर्वात मोठा आणि कळीचा मुद्दा ठरणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षीय आदेशापेक्षा वैयक्तिक संबंध, अंतर्गत गटबाजी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आर्थिक ताकद यांचा प्रभाव अधिक असतो. याच भीतीपोटी सर्वच पक्षांनी आपापल्या अधिकृत आणि अपक्ष मतदार सदस्यांची तटबंदी करण्यास सुरुवात केली आहे. मतदारांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी आणि फूट रोखण्यासाठी पडद्यामागे ‘रिसॉर्ट पॉलिटिक्स’ म्हणजेच मतदारांची सहल सुरू झाल्याची जोरदार चर्चा राजकीय वतुर्ळात आहे.

दुसरीकडे आचारसंहिता लागू झाल्यामुळे दोन्ही जिल्ह्यांत नवीन विकासकामांच्या घोषणा, निधी मंजुरी, शासकीय कार्यक्रमांतील राजकीय नेत्यांची उपस्थिती आणि जाहिरातबाजीवर कडक निर्बंध आले आहेत.निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, सुरक्षित आणि शांततेत पार पाडण्यासाठी सांगली व सातारा जिल्हा प्रशासनाने आपली तयारी पूर्ण केली आहे. थोडक्यात सांगायचे तर, सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची ही निवडणूक केवळ विधान परिषदेच्या एका जागेपुरती मर्यादित राहिलेली नाही. ही निवडणूक म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातील आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठीची एक प्रकारे राजकीय वर्चस्वाची खरी चाचणी मानली जात आहे. महायुतीतील अंतर्गत स्पर्धा आणि महाविकास आघाडीतील जागांचा समन्वय यावरच या निवडणुकीचा अंतिम निकाल मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार असल्याचे स्पष्ट संकेत सध्या दिसत आहेत.

यंदाची निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्यांसाठी प्रतिष्ठेची ठरणार असली, तरी खरी आणि अटीतटीची लढाई महायुतीतील अंतर्गत पक्षांमध्येच रंगण्याची चिन्हे आहेत.

आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वीची ’लिटमस टेस्ट’ मानल्या जाणाऱ्या या जागेवर वर्चस्व राखण्यासाठी दोन्ही बाजूंकडून आतापासूनच रणनीती आखली जात आहे.

# तंबाखूला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्र झपाट्याने प्रगती करत असताना दुसऱ्या बाजूला तंबाखूचे वाढते व्यसन समाजासमोर गंभीर आरोग्य संकट निर्माण करत आहे. गुटखा, पानमसाला, खर्रा, सिगारेट, बीडी तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन युवकांपासून प्रौढांपर्यंत चिंताजनक गतीने वाढताना दिसत आहे. या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी ३१ मे हा दिवस ‘जागतिक तंबाखू विरोधी दिन’ म्हणून साजरा केला जातो. यावर्षी ‘खोट्या आकर्षणाचा पर्दाफाश – निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाला चोख प्रत्युत्तर’ या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित केवळ जनजागृती न करता, समाजामध्ये तंबाखूविरोधी एक व्यापक जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. तंबाखू हे केवळ क्षणिक आनंदाचे व्यसन नसून ते तोंडाचा, घशाचा व फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयरोग आणि स्ट्रोक यांसारख्या अनेक जीवघेण्या आजारांचे मूळ कारण ठरत आहे.

या गंभीर आव्हानाचा सामना करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षभरात जनजागृती, समुपदेशन, व्यसनमुक्ती सेवा आणि कायद्याची अंमलबजावणी या चहुबाजूने प्रभावी कामगिरी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १७ तंबाखूमुक्ती समुपदेशन केंद्रातून एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ५,७६३ रुग्णांची नोंदणी करण्यात आली, ज्यापैकी ९८४ नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन पूर्णपणे सोडण्यात यश मिळवले आहे. ही आकडेवारी व्यसनमुक्तीच्या दिशेने पडणारे एक आशादायक पाऊल मानली जात असली, तरी दुसरीकडे राबविण्यात आलेल्या तपासणी मोहिमेत ७१३ संशयित रुग्णांपैकी ४२ जणांमध्ये कर्करोगाचे झालेले निदान समाजासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारे ठरले आहे.

तरुणाईला या जीवघेण्या विळख्यातून सुरक्षित ठेवण्यासाठी शैक्षणिक आणि आरोग्य संस्थांमध्ये विशेष उपक्रम राबवून जिल्ह्यात ११७ तंबाखूमुक्त शाळा आणि ५३६ तंबाखूमुक्त आरोग्य संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. शाळा परिसरात तंबाखू विक्रीला प्रतिबंध करण्यासोबतच विविध व्याख्याने, सामूहिक शपथ आणि पोस्टर मोहिमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडत आहेत. केवळ प्रबोधनावर न थांबता, कोटपा (COTPA 2003) कायद्यांतर्गत पोलीस, आरोग्य आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तपणे मोठी मोहीम उघडली आहे. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ५६१ लोकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यामध्ये आरोग्य विभागाने ४,६७,००० रुपये, पोलीस विभागाने १,९२,००० रुपये आणि अन्न व औषध प्रशासनाने ३४,००० रुपयांची दंडवसुली करत कायद्याचा कडक बडगा उगारला आहे.

धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीमुळे त्याच्या आसपास वावरणाऱ्या लहान मुलांच्या, महिलांच्या आणि वृद्धांच्या आरोग्याला निर्माण होणारा ‘पॅसिव्ह स्मोकिंग’चा धोका लक्षात घेता हा लढा आता केवळ प्रशासकीय न राहता समाजाची सामूहिक जबाबदारी बनला आहे. पालक, शिक्षक, ग्राम पंचायती आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन तरुणांना योग्य दिशा देणे ही काळाची गरज आहे. तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी १८००-११-२३५६ हा मोफत समुपदेशन टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून नागरिकांनी याचा लाभ घेणे आवश्यक आहे. ‘तंबाखूला नकार आणि निरोगी जीवनाचा स्वीकार’ करत सशक्त राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येक कोल्हापूरकराने या व्यसनमुक्तीच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे हेच या जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे खरे उद्दिष्ट ठरेल. जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तंबाखू विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आरोग्य, पोलीस व अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत संयुक्त मोहिमा राबविण्यात येत आहेत.

**– राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष कोल्हापूर**

# सौर ऊर्जेने उजळतोय दक्षिण महाराष्ट्र

**जागतिक** तापमानवाढ आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण जग आता शाश्वत ऊर्जेकडे वळत आहे. भारतानेही अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रगण्य भूमिका बजावत आहे. महाराष्ट्रात स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने मोठी झेप घेतली जात असून सौर ऊर्जेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागात मोठी ऊर्जा क्रांती घडत आहे.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प, सौर कृषी वाहिनी योजना, तसेच महावितरणच्या विविध उपक्रमांमुळे सांगली, सातारा आणि कोल्हापूर या दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये उल्लेखनीय प्रगती दिसून येत आहे.

राज्यात सौर ऊर्जेची एकूण क्षमता ८,४५० मेगावॅटपर्यंत पोहोचली असून सातारा हा जिल्हा या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसत. यामुळे केवळ ऊर्जा उत्पादन वाढले नाही, तर पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्वही कमी झाले आहे. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महावितरण या राज्याच्या प्रमुख वितरण कंपनीची महत्त्वाची भूमिका आहे. ही कंपनी राज्यातील हजारो गावांपर्यंत वीज पुरवठा करते. सौर प्रकल्पांना जोडून ऊर्जा वितरण अधिक सक्षम बनवत आहे. सातारा जिल्हा सौरग्राम संकल्पनेत विशेष अग्रेसर आहे. साताऱ्यातील मान्याचीवाडी हे राज्यातील पहिले ‘सौरग्राम’ ठरले आहे. येथे संपूर्ण गावाची विजेची गरज सौर ऊर्जेद्वारे पूर्ण केली जाते. या संकल्पनेमुळे ग्रामीण भागात २४ तास वीजपुरवठा शक्य झाला असून शाळा, अंगणवाडी, शेती सिंचन आणि घरगुती वापरासाठी हक्काची वीज उपलब्ध झाली आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्येही सौर कृषी वाहिनी योजना आणि रूफटॉप सोलर प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)मार्फत शेतकऱ्यांना सौर पंप आणि सिंचनासाठी सौर प्रणाली उपलब्ध करून दिली जात आहे. सौर पंपांमुळे शेतकऱ्यांचा वीज खर्च शून्यावर आला असून, विजेसाठी पावसावर किंवा रात्रीच्या वीज पुरवठ्यावर अवलंबून राहण्याची गरज उरलेली नाही.

सौर ऊर्जेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कार्बन उत्सर्जनात होणारी घट आणि पर्यावरण संरक्षण. ग्रामीण भागातील वीज खंडित होण्याचे प्रकार कमी होऊन सातत्यपूर्ण पुरवठा मिळत आहे. तसेच, ’प्रधानमंत्री सूर्यघर योजना’ आणि राज्य शासनाच्या अनुदानामुळे घरांवर सौर पॅनल बसवणे सर्वसामान्यांना परवडणारे झाले आहे.

३ किलोवॅटपर्यंतच्या सोलर प्रणालीवर ४०% पर्यंत अनुदान मिळत असल्याने मध्यमवर्गीय कुटुंबांना याचा मोठा आर्थिक लाभ होत आहे. दक्षिण महाराष्ट्रातील या जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली आहे. सोलर पॅनल बसवणे, देखभाल आणि तांत्रिक सेवा या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. उद्योग आणि शेती क्षेत्राला स्वस्त वीज उपलब्ध झाल्याने त्यांची उत्पादनक्षमता वाढली आहे. एकूणच, मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प आणि संबंधित योजनांमुळे दक्षिण महाराष्ट्रात सकारात्मक परिवर्तन होत आहे. येत्या काळात या प्रकल्पांचा विस्तार अधिक वेगाने झाल्यास ‘ऊर्जेत आत्मनिर्भर दक्षिण महाराष्ट्र’ ही संकल्पना लवकरच वास्तवात येईल.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

**भारताच्या** इतिहासात ज्या धाडसी, लोकल्याणकारी, शूर व संयमी, सामंजस्य, कर्तृत्ववान महिला होऊन गेल्या आहेत त्यात अहिल्यादेवी होळकर यांचे लोककल्याणकारी कार्य उज्वल व उल्लेखनीय आहे.

ऐन तारुण्यात वैधव्य आल्यानंतर ही आपले उर्वरित आयुष्य लोककल्याणसाठी वेचणाऱ्या आपल्या शुद्ध व पवित्र चारित्र्याने, रणधुरंधर नीतीने प्रतिस्पर्धीवर विजय मिळवून आणि अफाट दानधर्म मुळे लोकमाता बनलेल्या अहिल्यादेवी होळकर त्या तमोयुगातील शलाकाच होत. अहिल्यायांचा विवाह खंडेराव होळकरांशी झाला. व त्या अहिल्यादेवी खंडेराव होळकर बनल्या. एका सध्या सुध्या वाड्यात राहणारी अहिल्या इंदूरच्या राजमहालात पुत्र होऊन नांदू लागली. अहिल्यादेवी चा पती खंडेराव शूर होते परंतु व्यसनी होते.दुर्दैवाने कुंभरीच्या वेढ्यात तोफेचा गोळा लागून खंडेराव मरण पावले.तत्कालीन रूढीप्रमाणे त्यांच्या सासू सासऱ्याने अहिल्यादेवी ला सती जाण्यापासून रोखले. व पुढील आयुष्य प्रजेसाठी, व राज्यसाठी समर्पित करण्याची प्रतिज्ञा दिली व अहिल्यादेवीने ती प्रतिज्ञा आजन्म पाळली. अहिल्यादेवी इंदूरचा राज्यकारभार दक्षतेने करीत होत्या. नागरिक व सैन्यासाठी त्यांनी जागोजागी विहिरी खोदल्या, सुसज्ज धर्मशाळा उभारल्या, खासगी उत्पन्नाची रक्कम त्यांनी दानधर्म साठी खर्च केली. अहिल्या देवींनी अनेक मंदिरे बांधली, जुन्या देवस्थानां चा जीर्णोद्धार केला, अहिल्यादेवीना धर्मिकतेमागे मानवतेची दृष्टी होती. परकीयांनी पाडलेली मंदिरे व मस्जिद पुन्हा बांधल्या. रस्त्याने पायी चालणाऱ्या ओझेकरांसाठी ओटे बांधले. प्रजेच्या सदैव पाठीशी हा लोकमाता अहिल्यादेवीचा विशेष गुण. मुलींसाठी शाळा, स्त्रियांना शस्त्र शिक्षण देण्यास त्यांनी दोनशे वर्षापूर्वीच सुरुवात केली होती. प्रजाहितदक्ष अहिल्यादेवी कठोर शासक ही होत्या. त्यांनी आपल्या काळात हुंडा बंदी केली होती. आयुष्यभर रयतेच्या हितासाठी त्यानी आपले आयुष्य वेचले. अशा या महान लोककल्याणकारी देवीला कोटी! कोटी!! प्रणाम.



**– धोंडीरामसिंह राजपूत**

# नवतपा : ९ दिवसांचा सर्वाधिक तापमानाचा कालखंड

**नवतपा** हा उन्हाळ्यातील सर्वाधिक उष्णतेचा काळ मानला जातो. सूर्य जेव्हा रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो, तेव्हा सुरुवातीच्या ९ दिवसांना नवतपा म्हणतात. हा काळ सामान्यतः २५ मे ते २ जून दरम्यान असतो. या दिवसांत कडक उन्हामुळे तापमान खूप वाढते आणि मान्सूनमध्ये चांगला पाऊस पडण्याचे संकेत मिळतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख वाचकांच्या सेवेशी सविनय प्रस्तुत...संपादक.

प्रत्येक वर्षी उन्हाळ्यात नवतपाला सुरुवात होते. यंदा २५ मे रोजी नवतपा सुरू होत आहे. नवतपामध्ये पृथ्वीवर उष्णता प्रचंड वाढते. हिंदू ज्येष्ठ महिन्यात नवतपा येते. नवतपा काय आहे आणि या मुळे उष्णता का वाढते? जाणून घेऊया थोडक्यात याबद्दल माहिती.

नवतपा म्हणजे काय? : तर... सूर्य ज्यावेळी रोहिणी नक्षत्रात १५ दिवसांसाठी येतो, त्यावेळी त्या १५ दिवसामधील सुरुवातीचे ९ दिवस नवतपा म्हटले जातात. या ९ दिवसांमध्ये कोणत्याही प्रकारे पाऊस आणि थंड वारे नसल्यास मान्सूनमध्ये चांगला पाऊस येणार असे मानले जाते. असे का होते? : तर.. सूर्य १२ राशी आणि २७ नक्षत्रांमध्ये प्रवास करत असतो. ज्योतिष शास्त्रानुसार सूर्य कुंडलीत ज्या ग्रहांबरोबर बसतो, त्याचा प्रभाव कमी करून देतो. रोहिणी नक्षत्राचे अधिपती चंद्रमा आहे. अश्या वेळी जेव्हा सूर्य रोहिणी नक्षत्रामध्ये प्रवेश करतो, तेव्हा तो चंद्राचा थंडावा संपवून उष्णता वाढवतो. त्यामुळे पृथ्वीला थंडावा मिळत नाही आणि उष्णता प्रचंड वाढते. नवतपाच्या वेळी सूर्य किरणे थेट पृथ्वीवर येतात, ज्यामुळे तापमानात वाढ होते. या उच्च तापमानामुळे मैदानी क्षेत्रात कमी दाबाचे क्षेत्र बनते, जे समुद्री लाटांना आकर्षित करते. यामुळे अनेक ठिकाणी थंड, वादळ आणि पाऊस येण्याची दाट शक्यता असते. या वेळी वारे वाहत असलेले चालते, पण पाऊस नसावा. असे झाल्यास पाऊस व्यवस्थित पडतो. असं म्हणतात की, जसे चांगल्या प्रकारे शिजवलेल्लया अन्नाला चव चांगलीच येते, अगदी तसेच.

मे महिना सुरू होताच, ‘नवतपा’ हा विषय सर्वत्र चर्चेचा केंद्रबिंदू बनतो. जसजसे तापमान वाढू लागते आणि हवामान विभाग उष्णतेच्या लाटा व तीव्र उष्म्याबाबतचे इशारे जारी करू लागतो, तसतसे लोक आधीपासूनच खबरदारी घेण्यास सुरुवात करतात. घराघरात कुलर्स आणि पंख्यांची दुरुस्ती सुरू होते, पाण्याची साठवणूक केली जाते आणि दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळण्याचे नियोजन केले जाते. थोडक्यात सांगायचे तर, नवतपा हा असा काळ मानला जातो, जेव्हा सूर्याची किरणे पृथ्वीवर लंबरुपाने सर्वाधिक तीव्रतेने आणि प्रखरतेने पडतात, ज्यामुळे उष्णता आपल्या सर्वोच्च शिखरावर पोहोचते. या काळात, हवामानाचा प्रभाव इतका तीव्र असतो की अगदी दैनंदिन व्यवहारही विस्कळीत होऊ लागतात. नेमक्या याच कारणामुळे, नवतपा हा उन्हाळ्यातील सर्वात कठीण आणि आव्हानात्मक टप्पा मानला जातो. एक असा काळ जेव्हा सावधगिरी आणि पूर्वतयारी अत्यंत आवश्यक ठरते.

नवतपाचा खरा अर्थ काय आहे? तर... नवतपाचा संबंध ज्योतिषशास्त्र आणि हवामानशास्त्र या दोन्हीशी जोडलेला आहे. सूर्याने ‘रोहिणी नक्षत्रात’’ प्रवेश केल्यानंतरचे सलग नऊ दिवस एकत्रितपणे ‘नवतपा’ म्हणून ओळखले जातात. असा समज आहे की, या काळात सूर्य आपली सर्वाधिक तीव्र उष्णता उत्सर्जित करतो. यंदा सन २०२६ मध्ये, हा कालावधी २५ मे ते २ जून या दरम्यान असण्याची शक्यता आहे. या काळात अनेक भागांमधील तापमान ४५ अंश सेल्सिअस किंवा त्याहूनही अधिक वाढू शकते. नवतपाच्या दिवसांची भीती का वाटते? तर... नवतपाच्या काळात उष्णतेच्या लाटा आणि उष्माघाताचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. प्रखर सूर्यप्रकाश आणि गरम वाऱ्यांमुळे शरीराचे अंतर्गत तापमान वेगाने वाढते. जर शरीरात पाण्याचे प्रमाण कमी असेल किंवा एखाद्या व्यक्तीला दीर्घकाळापर्यंत उन्हात राहावे लागत असेल, तर ’’निर्जलीकरण’’ होऊ शकते. हा काळ लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि आधीपासूनच काही आरोग्यविषयक समस्या असलेल्या व्यक्तींसाठी विशेषतः धोकादायक मानला जातो. खरोखरच याच विशिष्ट दिवसांमध्ये सर्वाधिक तीव्र उष्णता का जाणवते? तर... मे महिन्याच्या अखेरीस आणि जूनच्या सुरुवातीला, सूर्याची किरणे पृथ्वीवर सरळ जवळजवळ लंबरूप पडतात, ज्यामुळे जमीन अत्यंत वेगाने तापते. तथापि हवामानाचे स्वरूप दरवर्षी सारखेच नसते, कधीकधी पाऊस किंवा सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे काहीसा दिलासा मिळू शकतो. तरीही, हे दिवस उन्हाळ्यातील सर्वात कठीण काळ आणि नवतपाचा आव्हानात्मक टप्पा म्हणून सर्वसामान्यपणे ओळखला जातो. ’’नौतपा’’ सुरू होण्यापूर्वी कोणती तयारी करणे आवश्यक आहे? तर... या काळात, शरीरातील पाण्याचे प्रमाण कायम राखणे ही सर्वात महत्त्वाची प्राथमिकता आहे. भरपूर पाणी प्या आणि जेव्हा कधीही तुम्ही घराबाहेर पडाल, तेव्हा सोबत पाण्याची बाटली बाळगा. शक्यतोवर दुपारी १२:०० ते सायंकाळी ४:०० या वेळेत घराबाहेर पडणे टाळा. हलके आणि सुती कपडे परिधान करा, तसेच डोके झाकलेले ठेवा. शरीराला थंडावा देण्यासाठी ओआरएस, लिंबूपाणी, ताक आणि नारळपाणी यांसारख्या गोष्टी घरात उपलब्ध असल्याची खात्री करा. कोणत्या धोक्याच्या संकेतांकडे दुर्लक्ष करू नये? तर...जर एखाद्या व्यक्तीला तीव्र डोकेदुखी, चक्कर येणे, उलट्या होणे, अतिशय तहान लागणे, अशक्तपणा जाणवणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे यांसारखी लक्षणे जाणवली, तर ती ‘उष्माघाता’ ची चिन्हे असू शकतात. अशा परिस्थितीत, त्या व्यक्तीला त्वरित एखाद्या थंड ठिकाणी हलवा आणि डॉक्टरांचा सल्ला घ्या. या ऋतूत केलेली थोडीशीही हलगर्जी गंभीर गुंतागुंतीस कारणीभूत ठरू शकते. एवढे मात्र ध्यानात घ्याच !!

– संकलन व सुलेखन–
**श्री कृष्णकुमार आनंदी**
**–गोविंदा निकोडे गुरूजी.**
( दिनविशेषकार)
श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ

सोमवार खेरीज दररोज
प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक
श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय,
३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# रामदेव बाबांच्या दिव्य फार्मसीला एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांचा दणका: ७३ लाखांहून अधिक किंमतीचा 'मिसब्रँडेड' औषधसाठा जप्त

मुंबई दि.३० (प्रतिनिधी)- ज्येष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या (एफडीए) आयुक्तपदाची सूत्रे हाती घेताच आक्षेपार्ह जाहिराती असलेल्या मिसब्रँडेड औषधीसाठ्याविरुद्ध एफडीएने राज्यभर धडक कारवाई सुरू केली असून या कारवाईचा सर्वात मोठा दणका योगगुरू बाबा रामदेव यांच्या दिव्य फार्मसी या आयुर्वेदिक औषधे उत्पादन करणाऱ्या कंपनीला बसला आहे. एफडीने राज्यभरात ७ जिल्ह्यातील १२ आयुर्वेदिक औषधविक्री आस्थापनामध्ये धडक कारवाई करून दिव्य फार्मसीचा ७३ लाखांहून अधिक किमतीचा आक्षेपार्ह जाहिराती असलेला व मिसब्रँडेड औषध साठा जप्त केला आहे.

जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा आस्थापनेला प्रशासनाकडून कोणतीही सवलत दिली जाणार नाही. भ्रामक व दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करणे आणि अवैध औषध उत्पादन व विक्रीविरुद्धची कारवाई यापुढे अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण असेल, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) नवनियुक्त आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

'औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४०' व इतर अनुषंगिक कायदे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात यापुढे थेट कायदेशीर न्यायालयीन कारवाई करण्यात येईल. सुरक्षित अन्न आणि औषध हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे आणि तो सुनिश्चित करणे हीच आमची मुख्य जबाबदारी आहे. ती आम्ही तत्परतेने व परिणामकारकरित्या पार पाडू'' असे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे.



आयुक्त मुंढे यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना जनतेच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या विभागांमध्ये मोहीम राबवण्यात आली.

'औषधे व जादूटोणाविरोधी (आक्षेपार्ह जाहिराती) कायदा १९५४ चा भंग केल्याप्रकरणी विभागनिहाय कारवाईमध्ये नागपूर मधील मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा रु. ७,२६,७५५/- चा साठा जप्त करण्यात आला.

नाशिक: मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा एकूण ७,१०,९४५ रुपये किंमतीचा औषध साठा जप्त.

पुणेः मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा एकूण १४,६८,९८१ रुपये किंमतीचा साठा जप्त.

बृहन्मुंबईः मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १,८५,६०० रुपये किंमतीचा साठा जप्त.

कोकण विभागः मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी १८,५८००० रुपये किमतीचा साठा जप्त.

अमरावतीः मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा औषध निरीक्षकांच्या कारवाईत रु. १,४२,२२९/- किमतीचा साठा जप्त.

छत्रपती संभाजीनगरः मे. दिव्या फार्मसी, हरिद्वार (उत्तराखंड) या उत्पादकाच्या औषधांचा एकूण रु. ४८७१८/- किमतीचा साठा जप्त.

पुणे विभागः तपासणीदरम्यान आढळलेल्या ०२ एलोपथी मिसब्रँडेड औषधांचा २१,८३,४२८ रुपये किंमतीचा साठा जप्त.

कुठल्याही औषधांवर असलेल्या भ्रामक जाहिरातींवर विश्वास न ठेवता स्वतः च्या मनाने औषधांचे सेवन करू नये. सेल्फ मेडिकेशनमुळे आरोग्याच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात, त्यामुळे अशा उत्पादनाबाबत प्रशासनाकडे तक्रार दाखल करावी, असे आवाहन आयुक्तांनी केली आहे.

नवीन मोबाईल ॲप आणि टोल-फ्री क्रमांक: नागरिकांना तक्रार करणे सोपे व्हावे यासाठी प्रशासनातर्फे लवकरच एक नवीन मोबाईल ॲप विकसित करण्यात येणार आहे, तसेच एक टोल-फ्री क्रमांक देखील कार्यान्वित करण्यात आला आहे.

तक्रार कशी करावी?

औषधांच्या दर्जाबाबत शंका असल्यास किंवा अवैध साठवणुकीची माहिती मिळाल्यास नागरिकांनी त्वरित एफडीएकडे तक्रार करावी. तक्रार करताना आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक तसेच संशयित आस्थापनेचा अचूक पत्ता आणि औषधाचे नाव स्पष्टपणे नमूद करावे.

गोपनीयतेची हमी: नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींची अत्यंत गोपनीयतेने पडताळणी करून तात्काळ कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सह आयुक्त (औषधे) गणेश रा. रोकडे यांनी कळवले आहे.

# नालेसफाईचे काम संथ गतीने; स्थायी समिती सभापतींची तीव्र नाराजी



छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- महापालिकेच्या वतीने जाफर गेट, मोती कारंजा, औषधी भवन, संभाजीपेठ आणि समर्थनगर परिसरात सुरू असलेल्या नालेसफाई कामांची पाहणी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी केली. यावेळी नालेसफाईचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी नाल्यांमधील गाळ काढण्यात आला असला तरी तो अद्याप उचलण्यात आलेला नसल्याचे दिसून आले. यापूर्वीही सभापती मकरिये यांनी वेळोवेळी या कामांची पाहणी केली होती. मात्र, अद्याप काम पूर्णत्वास गेले नसल्याने त्यांनी प्रशासनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

पावसाळयापूर्वी नालेसफाईची सर्व कामे पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन प्रशासनाने दिले होते. मात्र प्रत्यक्षात कामाचा वेग अपेक्षेपेक्षा कमी असल्याने नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळा तोंडावर असताना नालेसफाईचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी सभापती मकरीये यांनी आज दिले.

# स्वातंत्र्यवीर सावरकर १४३ वी जयंती निमित्त १४३ जलतरण स्पर्धकांचा सहभाग



छत्रपती संभाजीनगर दि.३० (प्रतिनिधी)- देशातील पहिलीच जलतरण स्पर्धा सावरकर जयंतीच्या माध्यमातून आयोजन करण्यात आले होते. नागरिकांचा, मुलांचा, महिलावर्गांचा, यात मोठा सहभाग होता. असे प्रतिपादन भाऊ सुरडकर यांनी त्यांच्या वक्तव्यात केलं. खंडात त्यांची गाजलेली उडी आजही प्रेरणा देऊन जाते असे आयोजक प्रदीप बुरांडे यांनी म्हटले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर १४३ वी जयंती महोत्सव समिती, छत्रपती संभाजीनगर तर्फे सिद्धार्थ उद्यान, छत्रपती संभाजीनगर येथे जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या जलतरण स्पर्धेमध्ये १४३ स्पर्धकाने सहभाग घेतला.

सकाळी ठीक १० वाजता जयंती महोत्सवाचे निमंत्रक भाऊ सुरडकर व आयोजक प्रदीप बुरांडे यांनी पहिल्या समूहाला झेंडा दाखवून स्पर्धेची सुरुवात केली. दुपारी साडेबारा वाजेपर्यंत ही स्पर्धा चालली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर महोत्सवाचे अध्यक्ष जालिंदर शेंडगे, निमंत्रक भाऊ सुरडकर, आयोजक प्रदीप बुरांडे, सुभाष कुमावत, विजय जहागीरदार, नगरसेविका शोभाताई बुरांडे, योगेश वाणी, आनंद वाघ, अभय देशमुख, प्रशांत पुराणिक, मुकेश शर्मा, यांच्या हस्ते सर्व स्पर्धकांना संपूर्ण तांब्याचे सावरकरांचे चित्र असलेले पदक प्रदान करण्यात आले. नियोजन समितीत जवळपास २५ व्यक्तींनी सहभाग घेतला.

(पान १ वरून)

## भगवा रुमाल गुंडाळून जरांगे यांचे..

असणाऱ्या हालचालींना गती आली असताना जरांगे यांनी आंतरवली सराटीमध्ये बाज टाकून उन्हात उपोषणास सुरुवात केली आहे. दरम्यान सरकारकडून चर्चा करण्यासाठी पुन्हा राधाकृष्ण विखे पाटील आंतरवली सराटीला जाणार आहेत. उपोषणातील मागण्यांच्या अनुषंगाने पुन्हा चर्चा करायला सरकारने यावे, असे आवाहन जरांगे यांनी उपोषणाला बसण्यापूर्वी केले होते. चर्चेतील मागण्यानुसार लेखी आश्वासनांची मागणी जरांगे यांनी केली आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या संदर्भात शासन निर्णय घेण्यात आला असला तरी प्रत्यक्षात प्रमाणपत्रे मात्र मिळत नाहीत. जी ५८ लाख कुणबी प्रमाणपत्रे दिली म्हणता त्याची यादी द्यावी, न्या. शिंदे आता गोव्याचे लोकायुक्त झालेले असल्याने समितीचे कामकाज त्यांच्याकडून होणार नाही. शिंदे समितीकडे पुरेसे मनुष्यबळ नाही.

## पुण्यात गुन्हेगारी वाढण्यास कारभारी...

आहे. विषारी दारू पिल्याने १८ पेक्षा अधिक नागरिकांना जीव गमवावा लागला. हा गंभीर प्रकार आहे. पुणे शहर आतापर्यंत शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जात होते. अनेक नामांकित शिक्षण संस्था येथे असल्याने राज्यासह देशातील आणि परदेशातील विद्यार्थी येथे शिक्षणासाठी येतात. गेल्या काही महिन्यांपासून शहरात बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती पाहता. गुन्हेगारीची राजधानी अशी ओळख पुणे शहराची होऊ लागली आहे. याला शहराचे कारभारी आणि पोलीस खात्याचा कारभार जबाबदार आहे. मुख्यमंत्र्यांनी तातडीने पोलीस आयुक्तांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणी खासदार सुळे यांनी केली.

## राज्याला वाऱ्यावर सोडून महाराष्ट्र...

की हे बंद करू. मी अनेक आमदारांची नावे देऊ शकतो जे लोकं मटके, दारूचे व्यवसाय करतात. हे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना माहिती आहे. विक्रेत्याला अटक केली पण पोशिंद्याला पकडत नाही. ते कोणालाही सोडू नका म्हणतात.

संजय राऊत म्हणाले की, हे सरकार अवैध धंदे करणाऱ्यांच्या आणि गुंडाच्या भिऊ नकोस मी तुझ्या पाठिशी आहे असे सांगते. काही झाले तर एक वाक्य मुख्यमंत्री म्हणतात आम्ही कोणालाही सोडणार नाही. ज्या लोकांचा काल बळी गेला त्यांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपये मदत करा, त्यामध्ये बहुतेक जण हिंदूच आहेत. आम्ही टीका केली की मग सरकारला मिर्च्या झोंबतात. मग त्यांचे लोकं समर्थन करायला पुढे येतात की विषारी दारू पिणे कसे योग्य आहे, असा टोला राऊत यांनी लगावला आहे.